(5) (MAGT) (MGT)
(म.गां.तं.मु.गाव) GM41080801

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:- DC
आवक नं.:-
13 AUG 2008
विशेष नोंद कक्ष नं.:-
कार्य विवरण नं.:-
जिल्हाधिकारी

"महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम"
तंटामुक्त गांव पुरस्कारासाठी पात्र गांवाची यादी
घोषित करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक तंमुगा: १००८/सीआर- ५०/पोल-१५,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- ९ ऑगस्ट, २००८.**

**वाचा:-**
१) शासन निर्णय क्रमांक एमआयएस : १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९ जुलै, २००७
२) शासन निर्णय क्र.तंमुगा:१००९/सीआर-३७ पोल-१५, दिनांक २८ सप्टेंबर, २००७
३) शासन निर्णय क्रमांक तंमुगा: १०१२/सीआर-७०/पोल-१५, दिनांक २६ डिसेंबर, २००७
४) शासन शुद्धिपत्रक क्रमांक एमआयएस : १००७/सीआर-२३८/पोल-१५, दिनांक २६ मार्च, २००८
५) शासन निर्णय क्रमांक तंमुगा: १००८/सीआर-२०/पोल-१५, दिनांक ११ एप्रिल, २००८
६) शासन निर्णय क्रमांक तंमुगा: १००८/सीआर-२५/पोल-१५, दिनांक १६ एप्रिल, २००८
७) शासन निर्णय क्रमांक तंमुगा: १००८/प्र.क्र.३६/पोल-१५, दिनांक १७ जून, २००८
८) पोलीस उप महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पोलीस मुख्यालय यांचे अ.शा.पत्र क्र. पोमस/४०/९०६९/म.गां.तं.मु.गा/१७/०७, दि. १/८/२००८, आणि सहाय्यक पोलीस उपमहानिरीक्षक यांचे समक्रमांकाचे दि. ८/८/२००८ चे पत्र.

**शासन निर्णय:-** गावात तंटे निर्माण होऊ नयेत, तसेच दाखल असलेले तंटे व नव्याने निर्माण होणारे तंटे लोकसहभागातून मिटविण्याची व्यवस्था निर्माण व्हावी आणि सामाजिक शांती प्रस्थापित होऊन राज्याची शांततेतून समृद्धीकडे वाटचाल व्हावी, या दृष्टीने दिनांक १५ ऑगस्ट, २००७ पासून "महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम" राज्यात सुरु करण्यात आली आहे. सन २००७-०८ हे वर्ष मोहिमेचे अंमलबजावणीचे प्रथम वर्ष आहे. मोहीम अंमलबजावणी कार्यक्रमानुसार १५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट, २००८ या कालावधीत ग्रामपंचायतींनी ग्रामसभा आयोजित करुन मोहिमेतील आपला सहभाग निश्चित करावयाचा होता. या मोहिमेत तंटामुक्त गाव समितीने, भविष्यात तंटे निर्माण होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आणि गावातील दाखल असलेल्या दिवाणी, महसुली, फौजदारी व इतर तंट्यांची माहिती ३० सप्टेंबर, २००७ पर्यंत संकलित करुन, दाखल तंटे व नव्याने निर्माण झालेले तंटे लोकसहभागातून सामोपचाराने मिटविण्यासाठी कार्यवाही करावयाची होती.

२.  भविष्यात तंटे निर्माण होऊ नयेत याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, दिनांक ३० सप्टेंबर, २००७ पूर्वी गावातील दाखल तंटे आणि ३० सप्टेंबर, २००७ नंतर निर्माण झालेले नवीन तंटे तडजोडीने व सामोपचाराने मिटविणे यासाठी दिनांक १९ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये अनुक्रमे ८०, १०० व २० असे एकूण २०० गुण विहित करण्यात आले आहेत. तंटामुक्त गाव जाहीर करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना, दाखल तंटे मिटविणे व नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे यासाठी अनुक्रमे ५६, ७० व १४ असे किमान गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर किमान गुणांची बेरीज १४० येत असली, तरी गाव तंटामुक्त म्हणून पात्र ठरण्यासाठी २०० गुणांपैकी १५० गुण मिळविणे आवश्यक आहे. २०० पैकी १९० गुण प्राप्त करणाऱ्या गावांना त्यांना मिळणाऱ्या पुरस्काराशिवाय पुरस्कार रक्कमेच्या २५ टक्के इतकी रक्कम विशिष्ट सन्मानचिन्हासह "शांतता पुरस्कार" म्हणून देण्याची तरतूद उपरोक्त दिनांक १९ जुलै, २००७ च्या निर्णयात करण्यात आली आहे.

३.  दिनांक १९ जुलै, २००७ च्या निर्णयात निर्धारित करण्यात आलेले तंटामुक्त गावाचे निकष स्वयंमूल्यमापनानुसार पूर्ण करणाऱ्या गावांच्या तंटामुक्त गाव समित्यानी दिनांक १ मे रोजी ग्रामसभेत गाव तंटामुक्त झाल्याचे घोषित करावयाचे होते. त्यानुसार राज्यातील एकूण ५२०५ गावांनी स्वयंमूल्यमापनानुसार गाव तंटामुक्त झाल्याचे घोषित केले. सदर गावांचे ५ मे, २००८ ते ५ जून, २००८ या कालावधीत जिल्हांतर्गत मूल्यमापन करण्यात आले, त्यात २८३२ गावे पुरस्कारासाठी पात्र ठरली. दिनांक २० जून, २००८ ते २५ जुलै, २००८ या कालावधीत या गावाचे जिल्हा बाह्य मूल्यमापन समित्यांकडून मूल्यमापन करण्यात आले असून, समित्यांनी आपला अहवाल शासनास सादर केला आहे. त्यानुसार राज्यातील तंटामुक्त गाव म्हणून पुरस्कारासाठी पात्र ठरणाऱ्या २३०९ गावांची आणि त्यातील विशेष पुरस्कारासाठी पात्र २४८ गावांची जिल्हानिहाय यादी **"परिशिष्ट-अ"** येथे घोषित करण्यांत येत आहे. सन २००१ च्या जनगणनेप्रमाणे गावाच्या लोकसंख्येनुसार त्यांना मिळालेल्या पुरस्काराची रक्कम गावाच्या नावासमोर सदर **"परिशिष्ट-अ"** येथे दर्शविण्यात आली आहे.

४.  पुरस्काराच्या रकमेच्या विनियोगाबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

५.  प्रत्येक जिल्ह्यातील पुरस्कार पात्र गावांना अनुज्ञेय ठरणाऱ्या पुरस्काराच्या रक्कमेइतक्या तरतुदींचे जिल्हानिहाय वितरण पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे करतील.

६. जिल्हा पोलीस अधीक्षक संबंधित जिल्ह्यातील पुरस्कार पात्र गावांच्या पुरस्काराच्या रक्कमेचे धनादेश तयार करतील आणि गावनिहाय त्याचे वितरण करतील.

७. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून गुणानुक्रमे प्रथम आलेल्या एका गावास आणि उर्वरित संपूर्ण राज्यातून गुणानुक्रमे ६७ अशा एकूण १०० गावांना मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री यांच्या हस्ते पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करुन तंटामुक्त गाव पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे. या १०० गावांची यादी व त्यांना प्रदान करावयाचे धनादेश याबाबतची कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे करतील.

८. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत तंटामुक्त गाव पुरस्कारासाठी होणारा खर्च मागणी क्र.बी-१, प्रधान लेखाशीर्ष- २०५५-पोलीस, (००) (१०९) - जिल्हा पोलीस (००) (१०) तंटामुक्त गाव मोहिम (२०५५-०५३ ३), ३१ सहायक अनुदान योजनेत्तर/ दत्तमत या खालील मंजूर तरतुदीतून करण्यात यावा.

९. सदर प्रयोजनार्थ काढावयाची देयके ही महाराष्ट्र कोषागार नियम नमुना क्रमांक - ३१ मध्ये सादर करुन यासाठी लागणारी रक्कम आरहित करावी.

१०. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र.क्र.३३१/व्यय-७, दिनांक ५/८/२००८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०८१११६५०४७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( चित्कला झुत्शी )
अपर मुख्य सचिव(गृह), महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १०.चरइ | १२०० | पात्र | - | | २००००० |
| | | | | ११.कोंढवी | १४०० | पात्र | - | | २००००० |
| | | | | १२.गोळेगणी | ८०० | पात्र | - | | १००००० |
| | | | | १३.कु डपण | १११० | पात्र | - | | २००००० |
| | | | | १४.चांभारगणी | ९०० | पात्र | - | | १००००० |
| | | | | १५.देवळे | ३२०० | पात्र | - | | ४००००० |
| | | | | १६.देवपूर | ८२५ | पात्र | - | | १००००० |
| | | | | १७.तुर्भे ख. | १०५० | पात्र | - | | २००००० |
| | | | | १८.परसुले | ७७३ | पात्र | - | | १००००० |
| | | | | १९.वाकंण | १२६० | पात्र | - | | २००००० |
| | | | | २०.बोरघर | ६३७ | पात्र | - | | १००००० |
| | | | | २१.महाळुंगे | ६९० | पात्र | - | | १००००० |
| | | रोहा | नागोठणे | १.पिंगोडा | १७९५ | पात्र | - | | २००००० |
| | | | | २.ऐनघर | ५१६२ | **पात्र** | **पात्र** | | ८७५००० |
| | | | | ३.वरवटणे | १९२२ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ४.पळस | १८०२ | **पात्र** | **पात्र** | | २५०००० |
| | | | | ५.वांगणी | २२७१ | पात्र | - | | ३००००० |
| | | | | ६.कडसुरे | १२१५ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ७.पाटणसइ | २७३१ | पात्र | - | | ३००००० |
| | | | | ८.वणी | १७६५ | **पात्र** | **पात्र** | | २५०००० |
| | | | | ९.कोंडगाव | २५६२ | पात्र | - | | ३००००० |
| | | | | | | | | | १०३५५०००० |
| ३ | रत्नागिरी | १.मंडणगड | १.मंडणगड | १.तिडे | १७०० | पात्र | - | | २००००० |
| | | | | २.पिंपळोली | ८८२ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ३.लाटवण | १५५४ | पात्र | - | | २००००० |
| | | २.दापोली | २.दापोली | १.पिसई | १३६५ | पात्र | - | | २००००० |
| | | | | २.विरसई | १११२ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ३.टाळसुरे | २१०२ | पात्र | - | | ३००००० |
| | | | | ४.कात्रण | १०११ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ५.जालगांव | ६४८१ | पात्र | - | | ७००००० |
| | | | | ६.इनाम पांगारी | ९९७ | पात्र | - | | १००००० |
| | | ३.खेड | ३.खेड | १.करटेल | ५५० | पात्र | - | | १००००० |
| | | | | २.चौगुले मोहल्ला | ८५० | पात्र | - | | १००००० |
| | | | | ३.होडखाड | १०१८ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ४.चिंचवली | १४५६ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ५.किंजळे तर्फे नातु | १५०० | पात्र | - | | २००००० |
| | | | | ६.हुमरी | ११८२ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ७.तळघर | ८५७ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ८.तुंबाड | ७४५ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ९.सातविंण गांव | ९४१ | पात्र | - | | १००००० |
| | | | | १०.सवणस खुर्द | १५६४ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ११.साखर | ८३२ | पात्र | - | | १००००० |
| | | | | १२.वडगाव | ३७६ | पात्र | - | | १००००० |
| | | | | १३.कोरेगांव | ८१७ | पात्र | - | | १००००० |
| | | | | १४.मडगांव | ३०५० | पात्र | - | | ४००००० |
| | | ४.गुहाघर | ४.गुहाघर | १.साखरी आगर | २१६६ | पात्र | - | | ३००००० |
| | | | | २.वेळंब पांगरी | ८७० | पात्र | - | | १००००० |
| | | ५.चिपळूण | ५.चिपळूण | १.खोपड | ४३३ | पात्र | - | | १००००० |
| | | | | २.कळवंडे | २०५८ | पात्र | - | | ३००००० |
| | | | | ३.गांगई | १२०० | पात्र | - | | २००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ६.अलोरे | १.वालोटी | ११०० | पात्र | - | | २००००० |
| | | | | २.कोंड फणसवणे | ११७६ | पात्र | - | | २००००० |
| | | | ७.सावर्डे | १.खांडोत्री | ८०७ | पात्र | - | | १००००० |
| | | | | २.मांडकी खु. | ८२६ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ३.वडेरू | ८३८ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ४.डेरवण | २०११ | पात्र | - | | ३००००० |
| | | ६.संगमेश्वर | ८.संगमेश्वर | १.मासरंग | ३०६ | पात्र | - | | १००००० |
| | | ७.रत्नागिरी | १०.रत्नागिरी ग्रा. | १.वेळवंड | २१५३ | पात्र | - | | ३००००० |
| | | | ११.जयगड | १.साखर मोहल्ला | ६२८ | पात्र | - | | १००००० |
| | | | | २.गडनरळ | २१०० | पात्र | - | | ३००००० |
| | | ८.लांजा | १२.लांजा | १.प्रभानवल्ली | २८११ | पात्र | - | | ३००००० |
| | | ९.राजापूर | १३.राजापूर | १.शिवणे खु. | १२०० | पात्र | - | | २००००० |
| | | | | २.हातदे | ५९७ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ३.वाल्ये | ७१९ | **पात्र** | **पात्र** | | १२५००० |
| | | | | ४.कोळवण खडी | ६६५ | **पात्र** | **पात्र** | | १२५००० |
| | | | | ५.शिवणे बु. | ६७१ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ६.कोतापूर | २००० | पात्र | - | | २००००० |
| | | | | ७.शेजवली | ५३० | पात्र | - | | १००००० |
| | | | | ८.परटवली | ७०० | **पात्र** | **पात्र** | | १२५००० |
| | | | १४.नाटे | १.दळे | २००० | पात्र | - | | २००००० |
| | | | | | | | | | ८७७५००० |
| ४ | सिंधुदुर्ग | १.वेंगुर्ला | १.वेंगुर्ला | १.पाल | १४७० | पात्र | - | | २००००० |
| | | | | २.अणसुर | ९९० | पात्र | - | | १००००० |
| | | २.दोडामार्ग | २.बांदा | १.तेरवण मेढे | १८२६ | पात्र | - | | २००००० |
| | | ३.मालवण | ३.आचरा | १.हिवाळे | १६९५ | पात्र | - | | २००००० |
| | | | | २.बांदिवडे खु. | ३७५ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ३.पळसंब | ९६० | पात्र | - | | १००००० |
| | | | | ४त्रिंबक | १६५४ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ५.निरोम | ८६७ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ६.राठीवडे | १०७१ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ७.मठबुद्रुक | १०२८ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ८.असगणी | ८०१ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ९.गोठणे | ९४४ | पात्र | - | | १००००० |
| | | | ४.मालवण | १.पेंडुर | ३५४३ | पात्र | - | | ४००००० |
| | | | | २.आमडोस | ७१४ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ३.महान | ४२५ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ४.साळेल | ७२८ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ५.चाफेखोल | ४७५ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ६.मसदे चुनवरे | १७०० | पात्र | - | | २००००० |
| | | | | ७.वेरळ | ७३९ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ८.हेदुळ | १३६५ | पात्र | - | | २००००० |
| | | | | ९.वडाचापाठ | १०२५ | पात्र | - | | २००००० |
| | | ४.वैभववाडी | ५.वैभववाडी | १.कोळपे | १६८० | पात्र | - | | २००००० |
| | | | | २.तिरवडे त.खा.पाट. | ८०० | पात्र | - | | १००००० |
| | | ५.कणकवली | ६.कणकवली | १.चिंचवली | ५५९ | पात्र | - | | १००००० |
| | | | | २.लोरे नं.१ | २२५० | पात्र | - | | ३००००० |
| | | | | ३.गांधीनगर | ४२१ | पात्र | - | | १००००० |
| | | | | ४.वायंगणी | ६३२ | पात्र | - | | १००००० |
| | | ६.कुडाळ | ७.कुडाळ | १.नानेली | ८६८ | पात्र | - | | १००००० |
| | | | | २.पुळास | ८४० | **पात्र** | **पात्र** | | १२५००० |